“लातूर जिल्यातील कुटुंब नियोजनाचा -- भोगोलिक अभ्यास ’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्यविद्या विद्या शाखे अंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी. या पदवी करीता सादर करण्यात येणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा.

-: संशोधक :-

श्री. शशिकांत संग्राम बिचकुंदे

एम ए (भूगोल) एम. फील.सेट.

-: मार्गदर्शक :-

डॉ . चिमनगुडे विश्वराज श्रीराम

एम ए (भूगोल) एम. फील. पीएच.डी.

संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड . जि. परभणी .

-: संशोधन केंद्र :-

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय ,लातूर

प्रस्तावना :-

कोणत्याही देशाचा आर्थिक ,सामाजिक ,राजकीय विकास हा त्या देशातील नेसर्गिक संसाधनांवर अवलंबून असतो .कोणत्याही देशातील नेसर्गिक संसाधनात 'लोकसंख्या 'एक महत्वाचे संसाधन आहे .

निसर्गाने मानवाचा पालन -पोषणासाठी अनेक नेसर्गिक संसाधनाची निर्मिती केली आहे .परंतु अलीकडील काळात वाटती लोकसंख्या बऱ्याच अशी नेसर्गिक संसाधनांवर ताण निर्माण करत आहे .जगातील बऱ्याच देशांना त्यात विकसित ,अविकसित देशांना लोकसंख्या विषयक बऱ्याच समश्या भेडसावत आहेत .त्यामुळेच लोकसंख्या विषयक समश्या सोडविण्यासाठी सर्वच विकासित ,अविकसित ,विकसनशील ,मागासलेल्या देशानी लोकसख्या विषयक धोरणच योग्य प्रकारे स्वीकार करून नियोजन करणे काळाची गरज निर्माण झाली आहे .

उष्णकटिबंधीय देशांत बऱ्याच अंशी वाढत्या लोकसंख्येचे केंद्रीकरण झालेले आहे .भारतासारख्या उष्णकटिबंधीय देशात जगातील दुसऱ्या क्रमांकाचे लोकसंख्येचे केंद्रीकरण झालेले आहे .सध्या स्थितीत भारतात जगातील लोकसंख्येच्या १६% लोकसंख्या केंद्रित झालेली आहे .

भारतात वाढणाऱ्या लोकसंख्ये मुळे दारिद्र्य ,बेकारी ,बेरोजगारी ,अन्नधान्याची टंचाई ,अशा समस्या निर्माण झालेल्या आहेत .त्यातूनच अभ्रक मृत्यूचे प्रमाण ,असमान लींग गुणोत्तर ,गर्भापात,अशा गंभीर समस्या निर्माण झालेल्या आहेत .त्यामुळे लोकसंख्येला नियंत्रित ठेवण्यासाठी भारत सरकारने लोकसंख्या विषयक धोरण निश्चित करून ते अंतर्गत 'कुटुंब नियोजनाचे' महत्व दिवसेंदिवस वाढत आहे किंवा महत्व वाढविणे काळाची गरज आहे .

लोकसंख्या धोरण व कुटुंब नियोजनाचे महत्व :-

सद्यास्थितील जगात विकसित ,अविकसित देशात लोकसंख्येच्या संदर्भांत अनेक समस्या निर्मण झालेल्या आहेत .वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक पर्यावरणीय व मानवनिर्मित समस्यां वाढलेल्या आहेत .वाढत्या लोकसंख्येला नियंत्रित ठेऊन ,पर्यावरणीय संसाधनावरील वाढता ताण कमी करण्यासाठी लोकसंख्या धोरण अंतर्गत **'कुटूंब नियोजन '** हा भक्कम पर्याय जगासमोर एक उत्तम पर्याय आहे .त्यादृष्टीने कुटूंबनियोजनाचे महत्व पुढीलप्रमाणे सांगता येईल .

१) वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी सर्वत्तम पर्याय म्हणून कुटूंबनियोजन अन्यत महत्वाचे स्थान आहे .

२) वाढत्या लोकसंख्येच्या दुषपरिणामाचा अभ्यास समजण्यास मदत होईल .

३) भारतीय समाज व कुटूंब नियोजन कार्यक्रमाची यशस्विता लक्षात येते .

४) मानव एक संसाधन म्हणून ,मानव संसाधनाची गुणवत्ता वाढविण्यास मदत होते .

५) सुरक्षित शरीर संबंध ,पत्नीवर मृतत्व न लादणे,लंगिक रोगापासून बचाव ह्या कुटूंबनियोजनाच्या त्रिसूत्री कार्यक्रमाचे महत्व लक्षात येते .

६) कुटूंब नियोजनासाठी वापरली जाणारी साधने व भारतीय समाज यातील संबध लक्षात येतो .

७) जास्त मुलाची संख्या असल्यास जोडप्याची व कुटूंबाची होणारी हानी याची जाणीव होते .

८) लंगिक रोगापासून मुक्त राहण्यासाठी कुटूंबनियोजन महत्वाचे आहे .

९) मोठ्या कुटूंबात मुलाचे शिक्षण ,पोषण ,त्यासाठी लागणार वेळ ,पेसा याचे महत्व लक्षात येते .

१०) ग्रामीण भागातील स्त्री - पुरुष याना कुटूंब नियोजनाचे महत्व लक्षात येते .

११) घरातील स्त्री व मुलाच्या चांगल्या आरोग्यासाठी छोटे कुटूंब अतिशय म्हत्वाचे आहे .

१२)कुटूंब केव्हा वाढवायचे या बद्दलचे संतती नियमनाव्दारे केलेले नियोजन म्हणजे कुटूंब नियोजन होय .

अभ्यास क्षत्राचे स्थान व विस्तार :-

लातूर शहर ही या जिल्हयाची राजधानी आहे. या शहरास प्राचीन इतिहास आहे. हेशहर राष्ट्रकूट घराण्याची . राजधानी होते. त्यानंतर हे शहर बऱ्याच राज्यकर्त्यांच्या ताब्यात गेले. १९ व्या शतकात ते हैदराबाद संस्थान संस्थानच्या अधिकारक्षेत्रात आले. १९४८ मध्ये हा भाग स्वतंत्र झाला व १९६०मध्येमहाराष्ट्रात आला. कालांतराने उस्मानाबाद जिल्हयाचे विभाजन होऊन **ऑगस्ट १६, १९८२** या दिवशी लातूर जिल्हा अस्तित्वात आला. लातूर जिल्हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील एक जिल्हा आहे. लातूर शहर हे जिल्हयाचे मुख्यालय असून महाराष्ट्र राज्यातील **16** व्या क्रमांकाचे मोठे शहर आहे.

स्थान व / विस्तार :- 17 ° 52 'उत्तर ते 18 ° 50' उत्तर आणि 76 ° 18 'पूर्व दख्खनचे पठार 79 ° 12 'पूर्व समुद्रसपाटीपासून वरील 631 मीटर (2,070 फूट) सरासरी उंचावर आहे. लातूरचा संपूर्ण जिल्हा बालाघाट पठार वर आहे, समुद्रसपाटीपासून 540 ते 638 मीटर उंच आहे. जिल्हा प्रामुख्याने कृषी आहे. नागरी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या 25.47% आहे. लातूर जिल्हयाचे क्षेत्र ७१५७ चो .किमी .आहे

सीमा :- लातूर जिल्हा नांदेड जिल्हयाच्या ईशान्येकडे बद्ध आहे; पूर्व आणि आग्नेयला कर्नाटक राज्याची सीमा आहे; नैऋत्येस उस्मानाबाद जिल्हा; पश्चिमेला बीड जिल्हा; आणि – उत्तर – पश्चिमेस परभणी जिल्हा आहे.

भाषा:- लातूर हे महाराष्ट्राच्या,आंध्र प्रदेशाच्या आणि कर्नाटकच्या सीमेवर असल्यामुळे त्यांच्यामध्ये अनेक परंपरा व रूढी यांची देवाणघेवाण झालेली आहे. लातूर जिल्हा व त्या लगतचे कित्येक लोक मराठी व्यतिरिक्त कन्नड आणि तेलुगू भाषा सहज बोलतात.

लोकसंख्या :- २०११ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २,४५४,१९६ इतकी म्हणजेच २५.४७% (२०११) आहे .

.या जिल्ह्यात उपविभाग पाच असून ,दहा तहशील कार्यालय आहेत .एकूण गावाची संख्या ९४८ (२०११)असून दहा पंचायत समित्या आहेत .जिल्ह्याची साक्षरता ७७.२६%(२०११) नुसार आहे .

-: लोकसंख्या विषयक धोरण व कुटुंब नियोजन :-

पूर्व अभ्यास (Review of literature)

प्रस्तुत संशोधनाचे महत्व खालील विचारातून लक्षात   येते .

१)   श्री .प्यारेकिशन वटलं :-

१९१६ मध्ये 'The population problem in India' या नावाचे पुस्तक प्रकाशित करून त्यात त्यांनी कुटुंब नियोजनाची आवश्यता प्रतिपादन केली .त्यांनी भारतातील   वाढत्या लोकसंख्येचेच्या संद्भ्रात लोकसंख्या प्रश्ना संबंधी आपले विचार लोकांसमोर मांडले .

२) **प्रोफेसर रघुनाथ धोंडो कर्वे** :-

यांनी १९२५ मध्ये मुंबई मध्ये पहिले संतती नियमन चिकित्सालय सुरु करून वाढत्या लोकसंख्या विषयक प्रश्नावर विचार मांडले .

3) **रवींद्र नाथ टागोर :-**

१९२५ मध्ये मार्गारेट स्नेगर याना असे म्हणाले कि. माझा मते संतती नियमन आंनदोलन हे एक फार मोठे आंदोलन आहे .कारण यामुळे केवळ मतृत्वाचीच रक्षा होत नाही तर लोकसंख्या वाढ कमी करून शांतीची स्थापना करण्यास मदत होईल .

४) म्हैसूर सरकार :-

भारतात स्वातंत्र्यापूर्वी काळात म्हैसूर सरकारने ११ जून १९३० मध्ये. जगातील पहिले शासकीय संतती नियमन चिकित्सालय सुरु केले.

५)मद्रास विश्र्वविद्यालय :-

१९३२ मध्ये मद्रास विद्यापीठ सिनेटने संतती नियमन ,विषयक शिक्षण देण्याची सूचना मांडणी केली व पुढील वर्षी मद्रास सरकारने मद्रास राज्यात संतती नियमन सुरूकेले.

६) संयुक्त राष्ट्र संघाची व्याख्या :-

लोकसंख्या केवळ जनन नियंत्रनाचा उद्दिष्ठये व उपाय योजना आणि त्यास परिपोषक असे कुटूंब नियोजन कार्यक्रम याचा समवेष होत नसून लोकांची आयु मर्यादा वाढविण्यासाठी लोकसंख्येची रचना ,भोगोलिक विभाजन यावर परिणाम घडवून आणणाऱ्या धोरणाचाही लोकसंख्येच्या धोरणात समावेश असणे आवश्यक आहे .

७) श्री.गोपाळ स्वामी :-

यांच्या अहवालानुसार "भारतातील स्त्रियांना अतिरिक्त मातृत्व वारंवार सहन करावे लागते ."तसेच "विकसित राष्ट्र मधून आयात केलेल्या. ज्ञानाचा व साधनांचा मदतीने मृत्यू दर कमी होत आहे .परंतु जन्म दर तोच राहिल्याने लोकसंख्या वाढीचा वेग वाढला आहे .आशा प्रकारे लोकसंख्या वाढण्यास राहाणीमानावर त्याचा परिणाम होईल ."म्हणजेच लोकसंख्या. वाढीमुळे प्रचंड गंभीर प्रश्न निर्माण झालेले आहे याची जाणीव झाली .त्यामुळे लोकसंख्या विषयक धोरण करणे आवश्यक होते .त्यानुसार सरकारने कुटूंब नियोजन विषयक धोरण तयार करून पुढे त्याला राष्ट्रीय धोरण म्हणून मान्यता दिली .

८) डॉ .राजेंद्र प्रसाद :-

डॉ राजेंद्र प्रसाद यांनी कुटूंब नियोजनाचा आवश्यक्ते संबंधी बोलताना असे. म्हटले होते कि ,"भारतातला वीज ,अन्न,ध्यान्य उत्पदनासाठी जितके लक्ष द्यावे लागत आहे .तितकेच लक्ष जन्मदर कमी करण्यासाठी देखील दिले पाहिजे ."

९) डॉ .चंद्रशेखर :-

यांनी कुटूंब नियोजन कार्यक्रम लवकरात लवकर. लागू करण्यावर जोर दिला .त्याच्या मते "आम्ही फार घाईत आहोत एक रात्र पण वाट पाहू शकतनाही .पाच मिनिटाचा प्रत्येक चुकीमुळे एक मुलाचा जन्म होत आहे व दर वर्षी भारतात ओस्ट्रेलियाच्या लोकसंख्ये इतकी लोकसंन्ख्या तयार होत आहे. कुटूंब नियोजना शिवाय प्रत्येक रात्र एक भयानक स्वप्न आहे ."

१०) राष्ट्रीय लोकसंख्या धोरण २००० :-

या धोरण नुसार कुटूंब नियोजनाची साधने ,शिक्षणावर भर ,कुटूंब कल्याण कार्यक्रम ,अभ्रक मृत्यू दर कमी करणे ,जन्म मृत्यू व विवाह संबधी नोंदणी पूर्ण करणे याची अमलबजावणी,करण्यासाठी राष्ट्रीय लोकसंख्या मंडळ व राज्य राज्यस्तरावर राज्य लोकसंख्या मंडळ याची स्थापना केली .

११) नवीन ध्येय धोरण :-

या. धोरणानुसार कुटुंब नियोजन हि संकल्पना लोकांपर्यंत पोहोचवणे व तिचा स्वीकार करून "लहान कुटुंब सुखी कुटुंब "हि संकल्पना राबविणे .

१२) पंच वार्षिक योजना :-

भारतात पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ते २००० च्या राट्रीय लोंकसंख्या धोरण तसेच आजपर्यंत प्रत्येक योजनेत कुटूंब नियोजन ,कुटूंब कल्याण कार्यक्रमासंदर्भात उद्दिष्ट्ये ,अमलबजावणी ,आर्थिक तरतूद निर्माण करून लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणाच्या प्रयत्न केलेला आहे .

वरील विचारवंत व धोरणानुसार भारतात कुटूंब नियोजनाची किती आवश्यकता आहे याची तीव्रता दिसून येते .

*** कुटूंब नियोजन -कार्यक्रम :-**

भारतात १९५२ साली म्हणजेच पहिल्या पंच'वार्षिक योजनेत कुटूंब नियोजन कार्यक्रमाची सुरवात झाली .तत्कालीन मुबई प्रातांत सण १९५७ पासून या कार्यक्रमाची सुरवात झाली .सण १९७१ पासून आजपर्यंत या कार्यक्रमात अनेक घटकाची भर पडली .सण १९७८ साली कुटूंब नियोजन कार्क्रमाचे नाव "कु;;तटूब कल्याण कार्यक्रम " असे करण्यात आले .तर सण १९९७ सालापासून हा कार्यक्रम "'प्रजनन आणि बालसंगोपन "या नावाने ओळखला जाऊ लागला ."हम दो ,हमारे दो "हे या कार्यक्रमाचे हिंदी भाषेतील घोषवाक्य आहे .

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१) लातूर जिल्ह्यातील लोकसंख्या विषयक धोरणाचा नेसर्गिक घटकावरील होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे .

२) अभ्यास क्षेत्रातील कुटूंब नियोजन नियोजनाचा अभ्यास करणे .

३) कुटूंब नियोजनाचा लातूर जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक विकासावरील परिणामाचा अभ्यास करणे

४) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी क्षेत्रातील कुटूंब नियोजन काय्रक्रमाचे योगदानाचा अभ्यास करणे .

५) लातूर जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा अभ्यास करणे .

६) अभ्यास क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येच्या दुष्परिणामांचा अभ्यास करणे .

७) लोकसंख्येवर संरचनेवर कुटूंब नियोजनाचा झालेला परिणाम अभ्यासणे .

गृहीतके :-

१) लातूर जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण ग्रामीण भागात कमी असल्याने कुटूंबनियोजन कार्यक्रमाचा प्रसार व प्राचार झालेला नाही .

२) कुटूंब नियोजन कार्यक्रमाची यशस्वी वाटचाल शैक्षणिक संस्था व त्याच्या विकासावर अवलंबन असते .

३) लातूर जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर विशेषतः बाल लिग गुणोत्तर प्रचंड असमानता आहे .

४) प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था अतिशय बिकट आहे .

५) लातूर जिल्ह्यातील गर्भनिदान चाचण्या व कुटूंब नियोजनाचा घनिष्ठ संबंध आहे .

६) कुटूंब नियोजनाची वाटचाल व लातूर जिल्ह्याचा विकास याचा घानिष्ठ संबंध आहे .

लातूर जिल्ह्यातील कुटूंब नियोजन कार्यक्रम :- माहिती स्त्रोत :-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी माहिती मिळवण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपातील माहीति स्त्रोताच्या उपयोग केला जाणार आहे .प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण मुलाखत व प्राश्नावली. चा उपयोग करण्यात येणार आहे .लातूर जिल्ह्यातील मुख्य चिकित्सा अधिकारी ,उप मुख्य चिकित्सा अधिकारी ,मेडिकल ऑफिसर अशा कुटूंब नियोजन संदर्भातील अधिकारी याच्या मुलाखती घेऊन प्राथमिक स्वरूपाची माहिती घेण्यात येईल .

लातूर जिल्ह्यातील नमुना सर्वेक्षण म्हणून कुटूंब नियोजन संर्भातील तीन ते चार प्राथमिक आरोग्य केंद्राची माहिती घेण्यात येईल .

तसेच दुय्यम स्वरूपातील माहिती मिळविण्यासाठी लातूर जिल्ह्याचा १९९१, २००१, २०११ या जनगणनेचा आवाहल .लातूर जिल्ह्यातील सामाजिक ,आर्थिक समालोचन ,विविध संशोधन पत्रिका ,लातूर जिल्ह्या गॉझेटियर ,विविध लोकसंख्या विषयक संर्दभाग्रथ ,लातूर जिल्ह्याचा आरोग्य विषयक अहवाल ,भारतीय भूस्थलदर्शक नकाशे ,गुगल अर्थ वेवसाईड इत्यादींचा आधार घेण्यात येईल .

कुटूंब नियोजन कार्यक्रमाची यशस्वी अमलबजावणी करण्यासाठी भारतात प्रत्येक राज्यात ,"कुटूंब. नियोजन ब्युरो " ची स्थापना करण्यात आली आहे. तसेच शहरी भागात "स्वस्थ नियोजन केंद्र "ची स्थापना केली .तर ग्रामीण भागात "प्राथमिक आरोग्य केंद्राची "स्थापना केली .

***लातूर जिल्ह्यास्तरीय :-कुट्टुब नियोजन संरचना :-**

१) मुख्य चिकीत्सा अधिकारी (मेडिकल)

२) मुख्य चिकीत्सा अधिकारी (स्वस्थ)

३) उप मुख्य चिकीत्सा अधिकारी (कुटूंब नियोजन)

प्रस्तुत संशोधन कुटूंब नियोजनाचं आधारित असल्याने उप मुख्य चिकीत्सा अधिकारी (कुटूंब नियोजन)याचा कार्यालयाचा आवाहल घेण्यात येईल .

*** ग्रामीण क्षेत्र :- कुटूंब नियोजन कार्यक्रम :- संरचना :-**

लातूर जिल्ह्यातील एकूण ४५ प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या आहे .प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात ...

मेडिकल ऑफिसर :- याचा अंतर्गत :-

- कुटूंब नियोजन स्वास्थ्य सहायक .
- इन्वेस्टीगेटर कम कॉप्युटर .
- स्वास्थ्य व्हिजिटर .
- सहायक उपचारिक (दाई)

वरील प्रमाणे लातूर जिल्ह्यात कुटूंब नियोजन कार्यक्रम संरचना प्रमाणे कुटूंब नियोजन कार्यक्रमाची उद्दिष्टे ,ध्येय ,उपलब्धी यशस्वी पणे राबविण्याचा प्रयत्न केला जातो.तसेच प्राथमिक व दुय्यम स्वारूपातील प्राप्त माहितीचे पृथ्थकरण विविध सांख्यकीय अभ्यास पध्द्तीचा उपयोग करण्यात येणार आहे .

उदा :-   प्रस्तुत संशोधनात प्राप्त झालेल्या माहितीच्या घटकांची टक्केवारी काढण्यासाठी सूत्र .

$$\text{१) घटकाची टक्केवारी (\%)} = \frac{\text{विशिष्ट घटकाची टक्केवारी}}{\text{एकूण घटकाची बेरीज}} \times १००$$

२) साक्षरता काढण्यासाठी सूत्र :-

$$\text{साक्षरता} = \frac{\text{साक्षर व्यक्तीची संख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times १००$$

३) लिंग गुणोत्तर काढण्यासाठी सूत्र :-

$$\text{लिंग गुणोत्तर} = \frac{\text{एखाद्या प्रदेशातील विशिष्ट काळातील एकूण पुरुषणाची संख्या}}{\text{त्याच प्रदेशातील त्याच काळातील एकूण स्त्रियांची संख्या}} \times १०००$$

४) लोकसंख्या वाढीचा शेकडा दर :-

$$r = \frac{P_1 - P_0}{P_0} \times 100$$

r = लोकसंख्या वाढीचा शेकडा दर

P_1 = दोन जनगणने पैकी सुरवातीच्या जनगणनेनुसार असणारी लोकसंख्या.

P_0 = दोन जनगणने पैकी नंतरच्या जनगणनेनुसार असणारी लोकसंख्या.

-: प्रकरण योजना :-

१) संकल्पनात्मक मांडणी :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास क्षेत्राची प्रस्तावना ,लोकसंख्या विषयक धोरण कुटूंब नियोजन महत्त्व ,अभ्यास क्षेत्राची निवड ,उद्दीष्ठे ,गृहीतके ,माहिती स्रोत ,प्रकरण योजना इत्यादींचा आढावा घेण्यात आला आहे .

२) लातूर जिल्हयातील भोगोलिक ,सामाजिक घटक :-

प्रकरण दोन मध्ये लातूर जिल्हयातील पाश्र्वभूमी भोगौलिक किंवा प्राकृतिक घटकात व सामाजिक घटकात विभाजन करण्यात आले आहे .भोगोलिक घटकामध्ये अभ्यास क्षेत्राचे स्थान व विस्तार ,प्राकृतिक रचना ,नदीप्रणाली ,हवामान ,पर्जन्य मृदा ,भूमी उपयोजन ,तर सामाजिक घटकांमध्ये लोकसंख्या ,लोकसंख्या रचना ,लिंगगुणोत्तर ,साक्षरता प्रमाण इत्यादींचा आढावा घेण्यात आला .

३) लोकसंख्या वाढ व संरचना :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये दशकीय वाढ ,ग्रामीण व नागरी लोकसंख्या वाढ ,जन्मदर ,मृत्युदर ,स्थलांतर ,लोकसंख्या वाढीची करणे ,प्रजनन ,लिंग गुणोत्तर ,बाल लिंग गुणोत्तर ,वय संरचना ,साक्षरता ,ग्रामीन व शहरी साक्षरता ,विवाह वय ,धर्म प्रारूप ,अशा लोकसंख्येच्या वैशिष्ट्याचा अभ्यास केला आहे .

४) लोकसंख्या धोरण व कुटूंब नियोजन कार्यक्रम :-

भारत लोकसंख्या धोरणांतर्गत कुटूंब नियोजन राज्यस्तरीय सांरचना ,जिल्हास्तरीय संरचना ,उपमुख्य चिकित्सा अधिकारी (कुटूंब नियोजन)यांचे कार्य व उद्द्दीष्ठे ,ग्रामीण क्षेत्र कुटूंब नियोजन कार्य व उद्दिष्ठे ,प्राथमिक आरोग्य केंद्र -मेडिकल ऑफिसर कार्य व उद्दिष्ठे ,नसबंदी कार्यक्रम ,निरोध ,गर्भानिरोधक गोळ्या ,गर्भपात ,माता व शिशु कल्याण कार्यक्रमाची उद्दिष्ठे व कार्य इत्यादी स्वरूपात कुटूंब नियोजन कार्यक्रमाची माहितीचा अभ्यास केलेला आहे .

५)कुटुंब नियोजन कार्यक्रमाच्या पध्द्ती व प्रकार :-

प्रस्तुत प्रकरणात कुटूंब नियोजनाचे प्रकार ,कुटूंब नियोजनाच्या पध्द्ती ,कुटूंब नियोजनाचे साधने ,कुटूंब नियोजन व स्त्री -पुरुष (धर्म निहाय),कुटूंब नियोजन व समाज इत्यादी वैशिष्ट्याचा अभ्यास केलेला आहे .

६) नमुना सर्वेक्षण :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये लातूर जिल्हयातील लोकसंख्या स्थितीचा ,कुटूंबनियोजन कार्यक्रमाचे यश -अपयश ,प्रकार ,पद्धती ,तसेच उदगीर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत कुट्टुब नियोजन कार्यक्रमाचे यश -अपयश याची माहिती प्रस्तुत प्रकरणात नमूद केलेली आहे.

७)कुटूंब नियोजन कार्यक्रमाचा नेसर्गिक घटक ,आर्थिक व सामाजिक विकासावरील परिणाम :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये भोगोलिक घटाकावरील परिणाम कुटूंब नियोजन कार्यक्रम व लातूर जिल्ह्यातील सामाजिक स्थिती ,शिक्षण संस्था ,शिक्षकाची संख्या व योगदान ,आर्थिक प्रगती'वरील परिणाम ,आरोग्य स्वच्छता ,शिशु कल्याण कार्यक्रम या घटकाचा विचार केलेला आहे .

८) निष्कर्ष व उपाय योजना :-

९) भविष्य कालीन अभ्यासाचे नियोजन :-

प्रथम वर्षाचे नयोजन :-

१) साहित्याचे पुनरावलोकन :-

यामध्ये अभ्यासाची उद्दिष्टे , निवडलेल्या विषयाची प्रकाशित ,अप्रकाशित साहित्य ,शोध प्रबंध,शोध पत्रिका आणि शासकीय कार्यालये यामधून माहिती संकलन करणे.

२) क्षेत्रीय अभ्यास आणि माहितीचे संकलन :-

यामध्ये विविध स्तोत्राचा साहयाने प्राथमिक आणि व्दितियक माहिती हि अभ्यास व विविध पद्धतीच्या साहयाने मिळविणे .

व्दितीय वर्षाचे नियोजन :-

यामध्ये संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण तक्ते,सांख्यकीय पद्धतीच्या साहयाने करणे.तसेच नकाशास्त्रीय पद्धत ,तंत्राच्या साहयाने माहितीचे विश्लेषण करणे.

१) माहितीचे विश्लेषण ,२) प्रबंधाचे लेखन व सादरीकरण करणे .

संदर्भ ग्रंथ :-

१) परिवार नियोजन भूगोल -विश्वभारती पब्लिकेशन ,नवी दिल्ली .

२) लोकसंख्या भूगोल -डॉ ओमप्रकाश शहापूरकर ,डॉ. सुरेश फुले ,डॉ.शंकरराव शेटे .

३) सांख्यिकीय कार्यालय ,जिल्हा परिषद लातूर .

४) जनगणना अहवाल (१९९१,२००१,२०११)लातूर जिल्हा सेन्सस हँडबुक .

५) लातूर जिल्हा गँझेटियर .

६) गुगल अर्थ वेबसाईड लातूर संदर्भात .

-: संशोधक :-

श्री. शशिकांत संग्राम बिचकुंदे

एम ए (भूगोल) एम. फील.सेट.

-: मार्गदर्शक :-

डॉ . चिमनगुडे विश्वराज श्रीराम

एम ए (भूगोल) एम. फील .पीएच.डी.